॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

**बातमी क्र.१**

जळगाव दि.१३ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यापीठस्तरीय युवक महोत्सवाला उदया गुरुवार दि. १४ फेब्रुवारी पासून विद्यापीठाच्या प्रांगणात प्रारंभ होत आहे. या महोत्सवात सहाशे विद्यार्थी कलावंत सहभागी होणार आहेत.

उदया सायंकाळी चार वाजता या युवारंग महोत्सवाचे उद्‌घाटन वैद्यकीय शिक्षणमंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते होणार असून अध्यक्षस्थानी कुलगुरु प्रा. पी.पी. पाटील राहणार आहेत. गुरुवारी दु. २ वाजेपासून येणा-या संघांची नोंदणी केली जाईल. उद्‌घाटनानंतर सायं. ७ वाजता संघव्यवस्थापकांची बैठक होणार आहे. यापूर्वी चाळीसगाव, जळगाव, कुसूंबा आणि तळोदा या चार ठिकाणी जिल्हास्तरीय युवक महोत्सव झाले. यातील विविध कला प्रकारातील प्रथम तीन विजेते विद्यापीठस्तरीय युवक महोत्सवात सहभागी होणार आहेत. यामध्ये ३१० विद्यार्थिनी आणि २८६ विद्यार्थी यांचा समावेश आहे. याशिवाय साथसंगत करणारे कलावंत आणि संघव्यवस्थापक दोनशेपेक्षा अधिक आहेत. प्रत्यक्ष स्पर्धा शुक्रवारी सकाळी ८ वाजता सुरु होतील.

---

**बातमी क्र.२**

जळगाव दि. १३ ( ) मुंबई येथे होणाऱ्या अश्वमेध क्रीडा महोत्सवासाठी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा संघ मंगळवारी रवाना झाला.

मुंबई विद्यापीठात १८ फेब्रुवारी पर्यंत अश्वमेध क्रीडा महोत्सव होत आहे. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे खो-खो, कबड्डी, व्हॉलीबॉल, बास्केटबॉल आणि मैदानी स्पर्धेत विद्यार्थी व विद्यार्थिनी सहभागी झ ाले आहेत. ६० विद्यार्थी व ६० विद्यार्थिनी असा १२० जणांचा संघ मुंबईला रवाना झाला. या खेळाडूंना कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील, प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर, व्यवस्थापन परिषद सदस्य दिलीप पाटील व दीपक पाटील, क्रीडा संचालक डॉ.दिनेश पाटील यांनी शुभेच्छा दिल्या. ९ ते १२ फेब्रुवारी या दरम्यान या खेळाडूंचे प्रशिक्षण शिबिर विद्यापीठाच्या क्रीडा संकुलात घेण्यात आले.

---

**बातमी क्र.३**

जळगाव दि.१३ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील स्त्री अभ्यास केंद्राच्या वतीने विद्यार्थिनींसाठी आठ दिवसीय स्वसंरक्षण कार्यशाळा घेण्यात आली.

विद्यापीठातील बाबुजगजीवन राम विद्यार्थिनी वसतिगृहात घेण्यात आलेल्या या शिबिरात जिल्हा क्रीडा प्रशिक्षक राजेंद्र जंजाळे यांनी ज्युडो कराटेचे प्रशिक्षण दिले. यामध्ये ७० विद्यार्थिनींनी भाग घेतला. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक प्रा.सत्यजित साळवे व सामाजिकशास्त्रे प्रशाळेच्या संचालक डॉ.अर्चना देगावकर यांच्या उपस्थितीत कार्यशाळेचा समारोप घेण्यात आला. यावेळी रेक्टर डॉ.मनिषा इंदाणी, डॉ.विश्रांती मुंजेवार, विशाल सपकाळे उपस्थित होते.

---

जा.क्र: कबचौ उमवि/१६/हस्तदेय/२०१९ दिनांक : १३ फेब्रुवारी, २०१९

प्रति,

मा. संपादक / प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरीत प्रत/-

(डॉ. सुनील पाटील )

जनसंपर्क अधिकारी